Reg.No. U01100MH2021PTC365340

# KRUSHICHANDRAMA AGRO PRODUCER COMPANY LIMITED

MAMDAPUR (PA.) TQ-AMBAJOGAI DIST-BEED

krushichandrama@gmail.com 9420152971,7071666999

Date. 08/10/2024

प्रति,

मा.प्रकल्प संचालक
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष,
स्मार्ट प्रकल्प , महाराष्ट्र राज्य , पुणे.

Reg. No. U0110MH2021 PTC365340

**विषय:- स्मार्ट प्रकल्प राबवित असताना होत असलेल्या अडवणुकी व त्रासा बाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयी आपणास सविनय कळविण्यात येते की**,** आमच्या कंपनीस स्मार्ट योजनेअंतर्गत गोदाम बांधणी**,** प्रोसेसिंग युनिट शेड**,** मशनरी ई. घटक मंजूर आहेत . यापैकी गोदाम बांधणी व प्रोसेसिंग युनिट शेड बांधकाम हे अंतिम टप्प्यात आहे. तसेच मशनरी क्लिनिंग ग्रीडिंग **4 TPH** ची टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली आहे . मंजुरी आदेशाप्रमाणे संबंधित पुरवठादारास पुरवठा आदेश दिला आहे. त्याप्रमाणे काही साहित्याचा पुरवठा संबंधित पुरवठादाराने आम्हाला केला पण आहे परंतु **29** ऑगस्ट **2024** रोजी मशनरी बसविणे कामावर बीड कार्यालयाने वरिष्ठ कार्यालयाच्या पत्रामुळे स्थगिती दिली आहे. आज पर्यंत स्थगिती शिथिल केली नाही चौकशी सुरू आहे असे सांगण्यात येत आहे. सोयाबीन काढणी व मळणी सुरू आहे चालू हंगामात मशीन बसविणे व परिसरातील शेतकरी बांधवांना वेळेत दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देणे हा कंपनीचा उद्देश आहे परंतु यामुळे अडथळा निर्माण झाला आहे. विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील प्रापन अधिकारी यांच्या उपस्थितीत सर्व कागदपत्रे तपासणी करून मंजुरी मिळाल्यानंतर आम्ही पुढील सर्व प्रक्रिया केली आहे. परंतु सय्यद फराज या कर्मचाऱ्यांनी जाणीवपूर्वक त्यांना पैसे न दिल्याने आम्हाला अडवणूक करण्याकरिता हरियाणा येथील कंपनीला हाताशी धरून तक्रार करावयास लावली यामुळे आमचे काम थांबले आहे.

यापूर्वीही या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी आम्हाला त्रास दिला आहे पैसे दिल्याशिवाय किंवा तक्रार केल्याशिवाय काम केले नाही.

तरी आपणास विनंती करण्यात येते की आम्हाला न्याय मिळावा व मशनरी बसविणे थांबलेले काम सुरू करण्याकरिता आपल्या मार्फत स्थगिती शिथिल करण्यात आली असा आदेश मिळावा ही नम्र विनंती.

**सोबत :-** 1) मंजुरी आदेश
2) कार्यारंभ आदेश
3) फोटो
4) स्थगिती आदेश
5) वेळोवेळी केलेले विनंती अर्ज

**Managing Director**
Krushichandrama Agro Producer Company Ltd
Mamdapur Pa. Tq. Ambajogai Dist. Beed

**प्रत्येक पाऊल प्रगतीकडे...**

Scanned with CamScanner